अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– ०६/१२/२०२४

## –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ३४/२०२४ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | श्री. रंजन चंद्रकांत बागवे, ४३ वर्षे, सहाय्यक अभियंता, घनकचरा व्यवस्थापन, ई वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. १०,००,०००/- तडजोडीअंती रू. ६,००,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. ३,००,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे बृहन्मुंबई महानगरपालिका विभागाचे पे ॲण्ड युज येथे कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करतात. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांच्या मार्फतीने पे ॲण्ड युज च्या सर्व कॉन्ट्रॅक्टरांना करारनामा बनवून घेण्याबाबत नोटीस पाठविण्यात आली होती. सदरहू नोटीस प्रमाणे करारनामा बनविण्याकरीता तक्रारदार यांनी ०२ वर्षापुर्वी ई वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, भायखळा, मुंबई येथे अर्ज दिला होता. परंतू मनपा अधिकाऱ्यांकडून करारनामा बनवून देण्याबाबत टाळाटाळ केली जात होती. ०२ महिन्यापुर्वी तक्रारदार यांची मनपा विभागाचे सहाय्यक अभियंता व दुय्यम अभियंता यांचेसोबत मिटींग झाली त्यावेळी उपरोक्त नमूद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे करारनामा बनवून देण्याकरीता रू. १०,००,०००/- लाचेची मागणी केली होती. त्यानंतर दिनांक २८/११/२०२४ रोजी पुन्हा लोकसेवक यांनी तक्रारदर यांना मोबाईलवर संपर्क साधून दिनांक २९/११/२०२४ रोजी लाचेची रक्कम घेवून भेटण्यास बोलाविले होते. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २९/११/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून लेखी तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २९/११/२०२४ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांना नंतर येण्यास सांगितले. त्यानुसार पुन्हा दिनांक ०५/१२/२०२४ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी/सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती रू. ६,००,०००/- ची मागणी करून पहिला हप्ता म्हणून रू. ३,००,०००/- लाचेची रक्कम स्विकारताना लोकसेवक यांना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणून लोकसेवक श्री. रंजन चंद्रकांत बागवे, सहाय्यक अभियंता, ई वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- श्री. प्रकाश सोनवणे, स.पो.आ. पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. गणेश सुर्यवंशी, पोलीस निरीक्षक
मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.
संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.

टोलफ्री क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
वेबसाईट :– acbmaharashtra.gov.in, ईमेल :– acbwebmail@mahapolice.gov.in
ईमेल :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
फेसबुक :– www.facebook.com - Maharashtra ACB
मोबाईल ॲप :– www.acbmaharashtra.net